**<u>रे.मु.नं. २४२/२०२२ मधील निशाणी १२ वरील आदेश</u>**

**१.** वादीचा निशाणी क्र. १२ वरील अर्ज वाचला. वादीतर्फे वकील श्री. ए. जी. पोखरकर यांनी असा युक्तीवाद केला आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे वडिल व प्रतिवादी क्र. १ यांचे आजोबा यांची वडिलोपार्जीत मिळकत आहे. दावा मिळकत गट नं. २६५ ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांना वाटपात आलेली असून त्यात प्रतिवादी क्र. १ यांचा कोणताही हक्क व हिस्सा नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी दि. ०७.१०.२०२२ रोजी अनाधिकाराने व बेकायदेशिरपणे दावा मिळकतीत घुसून घर बांधण्यास सुरुवात केली. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी स्वत: अगर इतरांमार्फत दावा मिळकतीत बांधकाम करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश व्हावा अशी विनंती केली.

**२.** त्यांनी असाही युक्तीवाद केला की, सदर अर्जाच्या दाव्याची नोटीस प्रतिवादी क्र. १ यांना पाठविली असता, दि.१८.१०.२०२२ रोजी सदर नोटीस त्यांची पत्नी मनिषा गणेश भास्कर यांनी घेण्यास नकार दिला. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १५ प्रमाणे सदर नोटीस ही प्रतिवादी क्र. १ यास मिळालेली आहे. तरीही प्रतिवादी क्र. १ आज रोजी न्यायालयात हजर झाला नाही. शिवाय दावा दाखल केल्याबाबत प्रतिवादी क्र. १ यास समजल्यानंतरही त्याने दावा मिळकतीत बेकायदेशीरपणे बांधकाम सुरुच ठेवले आहे. सबब, निशाणी क्र. ५ वरील मनाई अर्जाचा अंतिम निकाल होई पर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये असा आदेश करण्याबाबत विनंती केली आहे.

**३.** वादींनी दाव्यासोबत दावा मिळकतीचे सातबारा उतारे, फेरफार, तक्रार, फोटो इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. वादीचे अर्जातील कथन व सोबत दाखल केलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, प्रथमदर्शनी

वादीचे दावा मिळकतीत हक्क, हितसंबंध गुंतलेले आहेत. तसेच दावा मिळकतीच्या सातबारा उता—याचे अवलोकन करता, वादी व प्रतिवादी क्र. २ यांची नावाची नोंद असल्याचे दिसून येते. तसेच वादीचे वकिलांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे, वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यात सन २००३ साली दावा मिळकत व इतर वडिलोपार्जीत मिळकतीचे वाटप होवून दावा मिळकत गट नं. २६५ ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या हिश्यास आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच त्याबाबत नोंदणीकृत वाटणीपत्र होवून दावा मिळकतीच्या सातबारा सदरी वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या नावाची नोंद झाल्याची दिसते.

४. तसेच सदर अर्जाच्या दाव्याची नोटीस प्रतिवादी क्र. १ यांना पाठविली असता, दि.१८.१०.२०२२ रोजी सदर नोटीस त्यांची पत्नी मनिषा गणेश भास्कर यांनी घेण्यास नकार दिल्याचे बेलिफ अहवालावरुन दिसून येते. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १५ प्रमाणे सदर नोटीस ही प्रतिवादी क्र. १ यास मिळाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ हे दाव्यात हजर होवून त्यांनी त्यांचे म्हणणे मांडले असते तर उभय पक्षकारांमधील खरा वाद न्यायालयासमोर आला असता. परंतु प्रतिवादी यांना नोटीस मिळूनही ते हजर न झाल्याने व वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ हा दावा मिळकत अनाधिकाराने बांधकाम करत असलेल्या तक्रारीचे स्वरूप पाहता, प्रतिवादी क्र. १ हा दावा मिळकतीत करत असलेले बांधकाम थांबविण्याबाबत आदेश न झाल्यास वादीचे दावा मिळकतीतील हक्क व अधिकारांवर बाधा पोहचण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच त्यामुळे दाव्यातील गुंतागुंत वाढणार आहे. सबब, वरील सर्व परिस्थितीचा विचार करता, निशाणी क्र. ५ वरील अर्जावर प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे येवून निर्णय होण्यास अवधी लागणार असल्याने, सदर मनाई अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द दावा मिळकतीत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम न करण्याबाबत

निर्णय देणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**—: <u>आदेश</u> :—**

**१.** वादीचा अर्ज निशाणी क्र. १२ मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी क्र. ५ वरील मनाई अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत दावा मिळकतीत स्वत: अगर इतरांमार्फत कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये असा आदेश पारित करण्यात येतो.

(श्रीमती. एम. एस. माळी )
दिनांक : १९/१०/२०२२ — २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव